Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ५] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ४-१०, २०२१/माघ १५-२१, शके १९४२ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २४.

### जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांजकडून

**वाचा** :-(१) कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा चे ५ संचालक यांना पणन कायद्याचे कलम ४५ (१) नुसार बजावलेली कारणे दाखवा नोटिस दिनांक ०९ मार्च, २०२०

(२) या कार्यलयात आयोजीत सुनावणी दिनांक ०६ जुलै २०२०, २१ जुलै २०२०, ०४ ऑगस्ट २०२०, १० ऑगस्ट २०२०, १४ ऑगस्ट २०२०, २१ ऑगस्ट २०२०, २८ ऑगस्ट २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, १४ सप्टेंबर २०२०, २३ सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २७ ऑक्टोबर २०२०.

(३) महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांक कृपमं-बास-वर्धा-संचालक-क.४५(१)नोटिस-अभिप्राय-४०-२०२१, दिनाक ०६ जानेवारी, २०२१.

वर्धा कृषि उत्पन्न बाजार समिती वर्धा, ता. वर्धा, जि. वर्धा या समितीची स्थापना व रचना ही महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्या अंतर्गतचे नियम १९६७ मधील तरतुदीनुसार झालेली असल्यामुळे (यापुढे केवळ पणन कायदा व नियम असा उल्लेख केलेला आहे) सदर बाजार समिती व त्याच्या विद्यमान संचालक मंडळाला उपरोक्त नमुद पणन कायद्यातील व त्या अंतर्गत असलेल्या नियमातील तरतुदीनुसार तसेच बाजार समितीची उपविधी आणि शासनाचे व पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रकीय निर्देश तथा सुचना यांना अनुसरुन समितीचे कामकाज चालविणे बंधनकारक आहे.

कृषि उत्पन्न बाजार समिती, वर्धा चे १७ परवानाधारक अडते यांनी दिनांक ०४ मार्च, २०२० रोजी 'समितीचे धान्य व्यापारी श्री प्रशांत गंगाधरराव जगताप यांना खोट्या दस्तऐवजाच्या आधारे नविन धान्य व्यापारी परवाना दिल्याची तक्रार करुन सभापती तसेच अनुज्ञाप्ती उपसमिती सदस्य यांचेविरुद्ध प्रशासकिय व फौजदारी कार्यवाही करण्याबाबत' अर्ज या कार्यालयास सादर केला. सदर तक्रारीनुसार श्री प्रशांत गंगाधराव जगताप या व्यापा-याने ८० लाखाचे जवळपास रक्कम अडत्यांना अदा केलेली नसून सदर व्यापारी थकित असतांना देखील तसेच अडत्यांनी सदर व्यापा-याकडून रक्कम थकित असल्याचे बाजार समितीस वारंवार कळविण्यात येऊन देखील अनुज्ञप्ती समितीने सदर व्यापा-यास नविन धान्य परवाना अदा केला.

सदर तक्रारीची चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालानुसार सदर बाजार समितीच्या अनुज्ञाप्ती उपसमितीने व्यापारी परवाना देतांना अर्जाची सखोल तपासणी व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न करताच श्री प्रशांत गंगाधरराव जगताप यांना व्यापा-याचा नविन परवाना अदा केलेला आहे. सदर धान्य व्यापा-याचे परवाना अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये श्री मनोहर नामदेव नासरे या त्रयस्थ इसमाची सही नसलेले रु. ३ लाखाचे हमीपत्र जोडलेले आहे. तसेच त्रयस्थ व्यक्तीने म्हणजेच श्री. मनोहर नामदेव नासरे यांनी त्यांचे दिनांक १४ फेब्रुवारी २०२० चे पत्रान्वये त्यांनी यापूर्वीच ६ व्यक्तींना रु. १० लाखाचे जामीन दिले असल्याचे व श्री प्रशांत गंगाधरराव जगताप यांना कोणत्याही प्रकारचे रु. ३ लाखाचे हमीपत्र दिले नसल्याचे नमूद केले आहे. तसेच बाजार समितीचे उपविधी पोटनियम क्रमांक ७ नुसार एक त्रयस्थ व्यक्ती जास्तीत जास्त तीन जमिनदारांना हमी देऊ शकतो, अशी तरतूद असतांना सदर व्यापारी परवाना देतांना उपविधीचे उल्लंघन देखील झाले आहे. अशाप्रकारे अनुज्ञप्ती उपसमिती सदस्य तथा बाजार समितीचे खाली नमूद ५ संचालक यांनी बाजार समितीच्या आदर्श उपविधी चे उल्लंघन केले आहे. व अशाप्रकारे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करता परवाना प्राप्त करुन धान्य व्यापारी श्री प्रशांत गंगाधराव जगताप यांनी १७ अडत्यांचे पेमेंट देण्याचे थकविले आहे. सबब, या कार्यालयाने दिनांक ०९ मार्च, २०२० रोजी सदर बाजार समितीचे संचालक तसेच अनुज्ञप्ती उपसमिती मधील सदस्य सर्वश्री (१) प्रकाश सेवकदास पाटील, (२) शरद देवरावजी झोड, (३) विजय गजानन बंडेवार, (४) अरविंद बापुरावजी भुसारी आणि (५) सौ. वैशाली अनिलराव उमाटे यांना महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४५ (१) अंतर्गत कारणे दाखवा नोटिस बजावली. व त्यांन त्यांचे लेखी म्हणणे १५ दिवसांचे आत सादर करण्याबद्दल कळविण्यात आले तसेच प्रत्यक्ष सुनावणी दिनांक ३० मार्च २०२० रोजी निश्चित करण्यात आली होती.

दरम्यान, कोरोनामुळे देशात लॉकडाऊन जाहीर करण्यात आला व सर्व आस्थापना/कार्यालय बंद पडले. तद्नंतर कार्यालय सुरू झाल्यानंतर सदर प्रकरणी पुनःश्च सुनावण्या सुरू करण्यात आल्यात. त्याप्रमाणे प्रथम सुनावणी दिनांक ६ जुलै २०२० रोजी आयोजित केली असता लॉकडाऊनमुळे सर्व संबंधीतांनी वकीलांशी चर्चा होऊ न शकल्याचे तसेच बाजार समितीकडून काही कागदपत्रे आवश्यक असल्याने पुढील तारीख मिळणेबाबत विनंती केली. अशाप्रकारे दिनांक २१ जुलै २०२०, ४ आगॅस्ट २०२० रोजीच्या सुनावणीमध्ये देखील संबंधीतांनी पुढील तारीख मिळणेबाबत विनंती केली. दिनांक १० ऑगस्ट २०२० रोजीच्या सुनावणी दरम्यान, उपरोक्त ५ समिती सदस्यांपैकी (१) श्री. प्रकाश सेवकदास पाटील, (२) श्री. शरद देवरावजी झोड, (३) श्री. विजय गजानन बंडेवार यांनी आपले लेखी म्हणणे दाखल केले. सदर लेखी उत्तरामध्ये " त्यांनी नैसर्गिक न्यायाची संधी न देता कलम ४५(१) अन्वये नोटीस दिल्याचा उल्लेख करून कागदपत्रांची पुर्तता करून घेणे ही बाब बाजार समितीचे सचिवांचे असल्याचे नमूद केले. तसेच व्यापारी श्री. प्रशांत जगताप यांनी दिलेले चेक अनादरीत झाल्याचे कारणाने द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८ अन्वये न्यायालयात फौजदारी गुन्हे दाखल केले असून पिरॉडिकल तपासणी घेऊन पेमेंटची वस्तुस्थिती चेक करणे ही बाब प्रशासकीय असून आम्ही हेतू पुरस्सर याकडे दुर्लक्ष केलेले नाही."

उर्वरीत दोन समिती सदस्य (१) श्री. अरविंद बापुरावजी भुसारी, (२) सौ. वैशाली अनिलराव उमाटे त्यांचेवतीने ॲड. श्री. संजय घुगे यांनी वकालतनामा दाखल केला व लेखी म्हणणे दाखल करण्यासाठी पुढील तारीख मिळणेबाबत विनंती केली. त्यानंतर दिनांक १४ ऑगस्ट २०२० रोजी दोन समिती सदस्यांचे वकील यांनी विनंती केल्यामुळे पुढील सुनावणी दिनांक २१ ऑगस्ट २०२० रोजी आयोजीत करण्यात आली. सदर सुनावणी दरम्यान त्यांनी आपले लेखी म्हणणे दाखल केले. सदर लेखी म्हणण्यानुसार, " श्री. प्रशांत जगताप यांना नवीन परवाना देण्यास मंजूरी दिल्याबाबत कुठेही नोंद नसल्याचे तसेच सचिव यांनी प्रस्तावाबाबत कोणतीही चौकशी केलेली नाही व याबाबत त्यांना कोणतीही विचारणा करण्यात आली नसल्याचे नमूद केले आहे. तसेच श्री. अरविंद बापुरावजी भुसारी व सौ. वेशाली अनिलराव उमाटे हे फक्त अनुज्ञप्ती उपसमितीच्या दिनांक ५ नोव्हेंबर २०१९ च्या सभेला उपस्थित असल्याच्याच स्वाक्ष-या केल्या आहे व या प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे त्यांनी दिनांक ३ ऑगस्ट २०२० रोजी तक्रारीद्वारे या कार्यालयास कळविले आहे. सचिव हा कस्टोडियन म्हणून काम पाहात असून त्यांनीच कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणताही ठोस पुरावा नसल्याने त्यांचेवर खोट्या आरोपांच्या आधारावर कोणतीही कार्यवाही करू नये."

(१) श्री. प्रकाश सेवकदास पाटील (२) श्री. शरद देवरावजी झोड (३) श्री. विजय गजानन बंडेवार, यांचेवतीने ॲडव्होकेट श्री. व्ही. बी. हेरोळे यांनी आपला वकालतनामा दाखल केला व दिनांक १४ ऑक्टोबर २०२० रोजी ॲड. श्री. हेरोळे यांनी युक्तीवाद दाखल करतांना त्यामध्ये " सदर तक्रार ही अडते व खरेदीदार यांच्यामधील बाब असून सामंजस्याने यात तोडगा निघणे अपेक्षीत असून त्यामध्ये निष्कारण बाजार समिती व अनुज्ञप्ती उपसमिती सदस्यांना ओढण्यात आले आहे. चौकशी अधिका-याने चौकशी करताना बाजू मांडण्याची संधी दिली नसल्याचे व त्यामुळे त्यांचे ३ अर्जदारांची पणन कायद्याचे नियम ११७(४) खालची संधी हिरावल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच श्री. जगताप यांनी अनुज्ञप्ती मिळण्यासाठी केलेल्या अर्जावर अनुज्ञप्ती उपसमिती प्रमुखांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्यात यावी असे स्पष्ट नमूद केले आहे. तसेच श्री. जगताप यांचे नविन धान्य व्यापारी परवाना अर्जासोबत सादर केलेला श्री. मनोहर नामदेव नासरे यांचे जामीन बाबतचे हमीपत्र हे त्यांनी अन्य किती लोकांना दिले आहेत याची माहिती अर्जदारांना नसल्याचे देखील त्यांनी नमूद केले आहे."

त्यानुसार पुढील तारखेस ॲड. श्री. घुगे यांनी त्यांचे २ अर्जदार यांचेवतीने आपला युक्तीवाद दाखल केला त्यांनी त्यामध्ये " त्यांच्या लेखी उत्तरामध्ये नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रांची शहानिशा केली नाही. तसेच बाजार समितीचे सचिव हे कस्टोडियन म्हणून काम पाहात असल्याची कायद्यामध्ये तरतूद असल्याचे देखील नमूद केले. तसेच त्यांच्या अर्जदारांचे अनुज्ञप्ती उपसमिती सदस्य म्हणून कामकाज पाहात असतांना सचिवांनी कागदपत्रे छाननी केली अथवा नाही हे लक्षात आले नाही, म्हणून त्यांच्या ही बाब लक्षात आल्यावर दिनांक ०३ ऑगस्ट २०२० रोजी त्यांनी अनुज्ञप्ती उपसमितीच्या दिनांक ०५ नोव्हेंबर २०१९ च्या सभेतील ठराव मान्य नसल्याचा अर्ज दाखल केला. तसेच उर्वरीत ३ उपसमिती सदस्य यांना ही बाब मान्य असल्याने त्यांनी याबाबत कुठलीही तक्रार सदर बाब लक्षात आल्यावर दाखल केली नाही. करीता त्यांचे अर्जदार निर्दोष असून त्यांच्यावर कोणतीही अपात्रतेची कार्यवाही करू नये असा युक्तीवाद दाखल केला." सर्वच संचालकांचे वतीने लेखी उत्तरे व युक्तीवाद पूर्ण झाल्यानंतर सदर प्रकरण दिनांक २७ ऑक्टोबर २०२० रोजीच्या अंतीम सुनावणी नंतर आदेशाकरीता बंद करण्यात आले. तसेच पणन कायद्याच्या कलम ४५(१) मधील तरतुदीनुसार सदर प्रकरणाशी संबंधीत संपूर्ण कागदपत्रे (कारणे दाखवा नोटिस, उपरोक्त संचालकांनी सादर केलेला खुलासा, त्यांच्या वकिलांनी केलेला युक्तीवाद इत्यादी) अभिप्रायासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे यांचेकडे सादर करण्यात आली. तसेच सदर प्रकरणी दिनांक २८ डिसेंबर २०२० रोजी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे यांचे कार्यालयात उपस्थित राहून बाजू मांडण्यात आली. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे अभिप्राय संदर्भिय वाचा क्र. ४ अन्वये दिनांक ०६ जानेवारी २०२१ रोजी प्राप्त झालेत. त्यात या कार्यालयाने प्रस्तावित केलेल्या कारवाईस पणन मंडळ सहमत आहे. असे अभिप्राय कळविले आहेत.

एकंदरीत, अनुज्ञप्ती उपसमितीने, बाजार समिती प्रशासनाने सादर केलेली कागदपत्रे न तपासता अनुज्ञप्ती बहाल केलेली असल्याने त्यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम २९ मध्ये नेमून दिलेले कर्तव्ये व त्यांचे कामामध्ये कसूर करून उपविधी क्रमांक ७ चे उल्लंघन केल्याने यांचेविरूद्ध कायदेशिर कारवाई करणे आवश्यक आहे. बाजार समितीच्या प्रशासनाने चुकीच्या/अयोग्य पद्धतीने अनुज्ञप्तीची कागदपत्रे उपसमितीच्या पुढे ठेवली तरीही त्यांचे विरूद्ध कार्यवाही सुद्धा केलेली नाही. तसेच कागदपत्रांची शाहनिशा न करता, पूर्तता न करून घेताच अनुज्ञप्ती उपसमितीच्या सदस्यांनी व्यापारी श्री. प्रशांत गंगाधरराव जगताप यांना अनुज्ञप्ती मंजूर केलेली आहे. त्याच व्यापा-याने नंतर काही अडत्यांना त्यांची रक्कम दिलेली नाही. तसेच जी रक्कम धनादेशाने दिली, ते धनादेश नंतर अनादरीत (Bounce) झालेले आहेत व या अडत्यांना न्यायालयात दावे दाखल करावे लागत आहेत. बाजार समितीचे उपरोक्त पाचही संचालक यांनी अनुज्ञप्ती उपसमिती सदस्य म्हणून कामकाज करतांना योग्यरितीने जबाबदारी पार पाडलेली नाही. अशी माझी खात्री पटलेली आहे. त्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती, वर्धा च्या उपरोक्त ५ संचालक यांचेविरूद्ध कायदेशिर कारवाई करण्याचे आवश्यक असल्याचे माझे स्पष्ट मत आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४५(१) अंतर्गत आदेश**

क्रमांक जिउनि-नियमन-कृउबास-वर्धा-५ संचालक-५१३-२०२१.—

महाराष्ट्र शासन सहकार व कृषि विभागाचे अधिसूचना क्र. एप्रिल २०८१-३३६-४४०-११-स, दिनांक ५ सप्टेंबर १९८१ तसेच महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम,१९६३ चे कलम ४५(१) नुसार मला प्राप्त अधिकारानुसार मी, गौतम वालदे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा याद्वारे कृषि उत्पन्न बाजार समिती वर्धा या बाजार समितीने विद्यमान संचालक (१) श्री. प्रकाश सेवकदास पाटील, (२) श्री. शरद देवरावजी झोड, (३) श्री. विजय गजानन बंडेवार, (४) श्री. अरविंद बापुरावजी भुसारी, (५) सौ. वैशाली अनिलराव उमाटे यांना वर नमूद केलेल्या कारणामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती वर्धा च्या संचालक मंडळातून तसेच संचालक पदावरून निष्कासीत करीत आहे. तसेच उपरोक्त ५ संचालक हे पणन कायद्याच्या कलम ४५(२अ) मधील तरतुदीनुसार निष्कासीत आदेशाची अंमलबजावणी सुरू झाल्याच्या दिनांकापासून पुढील सहा (६) वर्षापर्यंत पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा नियुक्त करण्यास, नामनिर्देशित करण्यास, स्विकृत करण्यास किंवा पुन्हा समितीत स्विकृत करण्यास पात्र ठरणार नाहीत असे आदेश देत आहे.

सदर आदेश आज दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमीत करीत आहे.

**गौतम वालदे,**

वर्धा : जिल्हा उपनिबंधक,

दिनांक १८ जानेवारी २०२१. सहकारी संस्था, वर्धा.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५.

## अध्यक्षा, नगर परिषद, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अंतर्गत फेरबदल

क्रमांक नपका-न.र.वि.-फे-३७-२४७-२०२१.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. टी.पी.एस-२४०६-३१२३-प्र.क्र.-१३३-०७-नवि-९, दिनांक ४ नोव्हेंबर २००८ अन्वये काटोल शहरासाठी विकास योजना मंजूर केली आहे व ती दिनांक १५ डिसेंबर २००८ पासून अमलात आली आहे.

ज्याअर्थी, नियोजन प्राधिकरणाने म्हणजे नगर परिषद, काटोल ने मंजूर विकास योजनेतील पुढे दर्शविलेल्या तक्त्यातील जागेच्या स्थानमानात प्रत्यक्ष मोक्यावर भूमापन कार्यालयामार्फेत मोजणीचे "क" प्रत नुसार बदल झाला असल्याने त्यानुसार विकास आराखड्यात दुरुस्ती करण्याबाबत नगर पालिकेने सभेने ठरविलेले आहे. या बदलामुळे मंजूर झालेल्या विकास योजनेच्या स्वरूपात विशेष बदल होणार नाही.

**तक्ता**

| अ. क्र. | विकास आराखड्यानुसार सर्व्हे क्रमांक/ आरक्षण क्रमांक | विकास योजने प्रमाणे आरक्षण | आराजी | प्रस्तावित फेरबदल | नगरपरिषद सभेचा ठराव क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ८१४, ८१३, ७०९ | रहिवासीपयोगी क्षेत्र आणि त्यातून १८ मीटर विकास योजना रस्ता | ४.२२ हेक्टर आर | विकास आराखड्यातील १८ मीटर विकास योजना रस्त्याच्या स्थानमान दूरूस्ती बाबत | (१) विशेष सभा ठराव क्र. ३, दिनांक २३-०७-२०२०<br>(२) सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३०, दिनांक २८-१२-२०२० |

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित बदल दर्शविणारा नकाशा तयार करून तो नगर परिषदेच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळात सर्व जनतेस अवलोकनार्थ खुला ठेवला आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार अशी "जाहीर सूचना" देण्यात येत आहे की, वरील बदलाबाबत जर कोणत्याही व्यक्तीला काही हरकत असेल अथवा सूचना करावयाची असेल तर त्यांनी लेखी स्वरूपात अध्यक्ष, नगर परिषद काटोल यांचेकडे ही "जाहिर सूचना" "महाराष्ट्र शासन राजपत्रात" प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या पेक्षा जास्त नाही या कालावधीत द्यावी.

अशा सर्व सूचनांचा योग्य तो विचार वरील बदलाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यापूर्वी करण्यात येईल.

**वैशाली ठाकूर,**

काटोल : अध्यक्षा,

दिनांक १९ जानेवारी २०२१. नगर परिषद, काटोल.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २६.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

**Minor Modification under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No. MCK-37-D.P.-M.-247-2021.—

Whereas, Development Plan of Katol has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department *vide* it's Letter No. TPS-406-3123-Case No. 133-07-UD-9, Dated 04 November 2008 and it has came into force with effect from 15 December 2008.

Whereas, the Planning Authority *i.e.* Municipal Council, Katol has now decided to make position correction of 18 Meter Development Plan Road in the aforesaid sanctioned Development Plan of Katol which Actually doesn't correctly existed as per Land Record Department, Katol's Record. Thus, in respect of the purpose as per Municipal Resolution in following chart.

CHART

| Sr. No. | Survey No. | Reservation As per D. P. | Area As per D. P. | Purposed for Modification in Development Plan | Sanction Authority Municipal Resolution & date |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | 814, 813, 709 | Residential Zone with 18 Meter D. P. Road | 4.22 H. A. | Correction in the Position of 18 Meter D. P. Road | (1) Special Committee Resolution No. 03, Dated 23-07-2020. (2) General Committee Resolution No. 30, Dated 28-12-2020. |

And whereas, the Plan Showing the proposed Modification is kept open in the Office of Municipal Council, Katol, during office hours for inspection of public.

Therefore, under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, it's hereby notified that any person having any objection or suggestion regarding the proposed modification may communicate the same in writing to the President, Municipal Council, Katol within a period of not more than one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette.

The objections shall be considered by the Planning Authority before submitting the Proposal to the Government for sanction.

VAISHALI THAKUR,
President,
Municipal Council, Katol.

Katol :
Dated the 19th January 2021.

ना.-एक-अ-२ (१७१६).

## पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिध्द झालेली आहे.

---

३

---

**सोमवार, जानेवारी २५, २०२१/माघ ५, शके १९४२**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० जानेवारी २०२१.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२२१९-१४२९-प्र.क्र. १६९-नवि-९–२०१९.—

ज्याअर्थी, ब्रम्हपुरी शहराची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१(१) अन्वये, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस-२२९९-१००१-प्र. क्र. १११, नवि-९, दिनांक २८ जून २००२ अन्वये भागशः मंजूर झालेली असून सदर विकास योजना दिनांक २६ ऑगस्ट २००२ पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन नगर विकास, अधिसूचना क्र. टिपीएस-२२९९-१००१-प्र.क्र.१११-नवि-९, दिनांक १३ जुलै, २००५ मंजूर झाली आहे. ("उक्त विकास योजना" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजा ब्रम्हपुरी, येथील सर्व्हे क्र. २८, २९, ३०, ३३, ३४, ३५, ७९५ व ७९६ एकूण क्षेत्र ५.७४ हेक्टर पैकी अंदाजे ४.४०.२५ हेक्टर जागा कृषी विभागामध्ये समाविष्ट आहे. (यापुढे "उक्त जागा" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, ब्रम्हपुरी नगर परिषद, ब्रम्हपुरी नियोजन प्राधीकरण यांनी (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे) म्हणून, त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ०१, दिनांक ०२ जानेवारी २०१९ नुसार उक्त जागा वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे ठरवून, त्याअनुषंगाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप-कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्तावास मंजुरीसाठी शासनास सादर केलेला आहे. (यापुढे "प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त प्रस्तावित फेरबदल काही अटींसह मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकानी सन २०२०-२१ या वर्षातील बाजार मूल्य दर तक्त्यानुसार येणा-या दराच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमूल्याची ५०% रक्कम रूपये २,१३,१०० सहायक संचालक, नगर रचना, चंद्रपूर शाखा, चंद्रपूर यांचेकडील लेखाशिर्षामध्ये दिनांक ०४ डिसेंबर २०२० रोजी जमा केलेली आहे. आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रूपये २,१३,१०० मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगर परिषद, ब्रम्हपुरी यांचेकडे दिनांक ०४ डिसेंबर, २०२० रोजी जमा केलेली आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदल शासन पुढील प्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखीत दिनांक २८ जून २००२ ची विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे.

"उक्त विकास योजना मंजुरीच्या दिनांक २८ जून २००२ च्या अधिसूचनेच्या फेरबदल सूचितील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे."

**नोंद**

मौजे ब्रम्हपुरी येथील सर्व्हे क्र. २८, २९, ३०, ३३, ३४, ३५, ७९५ व ७९६ एकूण क्षेत्र ५.७४ हेक्टर पैकी अंदाजे ४.४०.२५ हेक्टर मधील सोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार उक्त जागा कृषि विभागातून वगळण्यात येऊन रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

**अट क्र. १-** ब्रम्हपुरी शहराच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार, जागेच्या रेखांकनात आवश्यक खुले क्षेत्राव्यतिरिक्त आवश्यक क्षेत्र सार्वजनिक सुविधा क्षेत्रासाठी सोडणे बंधनकारक राहील.

**अट क्र. २-** उक्त जमिनीसाठी आवश्यक मूलभूत सोयीसुविधा स्वखर्चाने विकसित करणे जमीन मालकावर बंधनकारक राहील.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारी प्रस्तुत अधिसूचना / भाग नकाशा मुख्याधिकारी, ब्रम्हपुरी नगर परिषद, ब्रम्हपुरी यांच्या कार्यालयात, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात येत आहे.

सदरची अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in** (कायदे व नियम) या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**प्रणव कर्पे,**
कार्यासन अधिकारी.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, Dated the 20th January, 2021.

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS-2219-1429-CR-169-UD-9-2019.—

Whereas, the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS -2299-1001-C. R. 111-UD-9, dated 28th June, 2002 has sanctioned the Development Plan for the Bramhapuri Town & came into force with effect from the 26th August, 2002 and excluding part of the Development Plan has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2299-1001-C.R.111-UD-9, dated the 13th July 2005 (hereinafter referred to as "the said Development Plan") under Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act");

And whereas, in the said Development Plan, out of area admeasuring 4.40.25 Hector of the total area 5.74 Hector of lnd bearing Survey Nos. 28, 29, 30, 33, 34, 35, 795 & 796 of Mouje Bramhapuri are included in "Agriculture Zone "(hereinafter referred to as "the said Lands");

And whereas, the Bramhapuri Municipal Council, being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Planning Authority"), *vide* its General Body Resolution No. 01, dated 02nd January 2019 has resolved to delete said Lands and include the same in Residential Zone and Accordingly submitted a modification proposal to the Government, for its sanction as per the provisions of sub-section *(1)* of Section 37 of the said Act, (hereinafter referred to as "the Proposed Modification") ;

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune the Government is of opinion that the proposed Modification should be sanctioned is some condtions;

And whereas, the said Lands Owners have deposited Rs. 2,13,100 towards the 50% Government share of 5% premium amount as per the rate of the said lands as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2020-21 in the Government Treasury on 04th December 2020 through the Assistant Director of Town Planning, Chandrapur Branch, Chandrapur and remaining 50% of the 5% premium amount Rs. 2,13,100 payable to the Planning Authority has been deposited with the Chief Officer, Bramhapuri Municipal Council on 4th December 2020;

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section *(2)* of Section 37 of the said Act, the Government hereby, sanctions the Proposed Modification and for that purpose amends the aforesaid Notification dated the 28th June 2002 as follows ;

"In the Schedule of Modifications appended to the Notification dated 28 th June 2002 sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry. "

*ENTRY*

The out of area admeasuring 4.40.25 Hector of the total area 5.74 Hector of land bearing Survey Nos. 28, 29, 30, 33, 34, 35, 795 & 796 of Mouje Bramhapuri are deleted from Agriculture Zone and is included in Residential Zone as shown on the plan.

*Condition No. 1* – In addition to open space, necessary Amenity Space shall be provided in the layout of the said Land as per the prevailing Development control Regulations of Bramhapuri.

*Condition No. 1* – It is binding on the land owner to provide all Basic Amenities required for the land at his own cost.

A copy of the Notification, along with the part plan showing the aforesaid sanctioned modification, shall be available for inspection of the general public, in the office of the Chief Officer, Bramhapuri Municipal Council during office hours on all working days for a period of one month.

This Notification shall also be available on the Government web site *www.maharashtra.gov. in* (Act and Rule)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Section Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.